# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 19 January 2026
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १९ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- स्वित्झर्लंडमध्ये आजपासून होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत मुख्यमंत्र्यांचा सहभाग
- देशाचं संरक्षण उत्पादन क्षेत्र आत्मनिर्भर बनवणं सरकारचं प्रमुख उद्दिष्ट – संरक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन
- नांदेडमध्ये येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी होणाऱ्या ‘हिंद दी चादर’ कार्यक्रमाची जय्यत तयारी
- अजिंठा – वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातला यंदाचा पद्मपाणि पुरस्कार ज्येष्ठ संगीतकार इलयाराजा यांना जाहीर

आणि

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेत न्यूझीलंडचा २–१ नं विजय

****

स्वित्झर्लंडमध्ये आजपासून सुरु होत असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी होत आहेत. या परिषदेत महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याच्या संकल्पना आणि संधी जागतिक नेत्यांसमोर सादर केल्या जातील. गेल्या वर्षी १६ लाख कोटींच्या गुंतवणूक करारानंतर यंदा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचा उद्देश राज्य शासनानं ठेवला आहे. परिषदेत जागतिक उद्योगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी संवाद साधून महाराष्ट्रात थेट विदेशी गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर भर दिला जाणार आहे.

दरम्यान, काल झुरीच इथं बृहन महाराष्ट्र मंडळाच्या वतीने मुख्यमंत्र्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित केला होता. महाराष्ट्र देशातलं पहिलं राज्य ठरेल जे ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था साध्य करेल आणि पुढील ३–४ वर्षांत हे उद्दिष्ट साध्य होईल, असं फडणवीस यावेळी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पायाभूत सुविधा आणि मुंबईसह राज्यातल्या शहरांचा विकास प्रगत होत आहे. पुढील पाच वर्षांत मुंबईसह नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूरमध्येही लक्षणीय विकास दिसेल, महाराष्ट्र थांबणार नाही, राज्य वेगाने पुढे जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल आसाममधल्या काझीरंगा उन्नत मार्ग प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. सुमारे सात हजार कोटी रुपये गुंतवणुक असलेल्या आणि राष्ट्रीय महामार्ग, ७१५ च्या कालियाबोर–नुमालीगढ विभागाचं चौपदरीकरण याद्वारे प्रस्तावित आहे. आपल्या सरकारच्या विकास कामांमुळे भारतीय जनता पक्षानं महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतही स्पष्ट बहुमत दिल्याचा उल्लेखही मोदी यांनी यावेळी केला. ते म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

देशाचं संरक्षण उत्पादन क्षेत्र आत्मनिर्भर बनवणं हे सरकारचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं काल कोंढाळी मार्गावरील शिवा- सावंगा परिसरात सोलर इंडस्ट्रीज द्वारा स्थापित मिडीयम कॅलिबर अम्युनिशन फॅसिलिटी इथं पिनाका गायडेड रॅकेटचं पहिलं उत्पादन काल राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत पाठवण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

**बाईट – संरक्षण मंत्री राजनाथ सिंह**

****

७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथ ‘गणेशोत्सव – आत्मनिर्भरतेचं प्रतीक’ या संकल्पनेवर आधारित असेल. या चित्ररथातून राज्याची परंपरा आणि अर्थव्यवस्थेचं दृष्य साकारलं जाणार आहे. या सोहळ्यासाठी युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यंदा प्रथमच ‘बॅटल अॅरे’ या युद्ध रचनेचं प्रदर्शन प्रजासत्ताक दिन संचलनात होणार असून, अर्जुन टँक, टी–९० भीष्म, राफेल विमानं आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची चित्तथरारक प्रात्यक्षिकं होणार आहेत. संचलनात लष्कराच्या १८ तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील.

****

महापालिका निवडणुकीत काँग्रेसनं कोणतीही तडजोड न करता वैचारिक लढा दिला असं प्रतिपादन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं. मुंबईत काँग्रेस नेत्यांसोबतच्या बैठकीनंतर ते काल माध्यमांशी बोलत होते. आगामी जिल्हा परिषद निवडणूक ही शक्य असेल तिथं समविचारी पक्षांना सोबत घेवून लढू, मात्र, कोणत्याही परिस्थितीत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत आम्ही जाणार नाही, असं सपकाळ यांनी स्पष्ट केलं. अहिल्याबाई होळकर यांनी वारासणीत बांधलेल्या मणिकर्णिका घाटावर सरकारनं बुलडोझर चालवला असून, घाटावरील अनेक दैवतांच्या मूर्ती उध्वस्त झाल्या आहेत. याप्रकरणी सरकारने माफी मागावी अन्यथा काँग्रेस पक्ष थेट काशीत आणि महाराष्ट्रभर आत्मक्लेश आंदोलन करणार असल्याचा इशारा देखील सपकाळ यांनी दिला.

****

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य वर्षानिमित्त नांदेडमध्ये येत्या २४ आणि २५ जानेवारी रोजी होणाऱ्या ‘हिंद दी चादर’ कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी काल नांदेडमध्ये घेतला. या कार्यक्रमानिमित्त भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांसाठी मराठवाड्यातल्या सर्व सामाजिक संघटनांनी पुढे येण्याचं आवाहन पापळकर यांनी केलं. या कार्यक्रमाविषयी माहिती देताना ते म्हणाले,

**बाईट – विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर**

दरम्यान, ‘हिंद दी चादर’ निमित्त तेगबहाद्दूर यांचं कार्य आणि इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी छत्रपती संभाजीनगर इथल्या शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम सुरू आहेत. विविध स्पर्धांमधून १३६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती शिक्षण विभागानं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथच होणाऱ्या अकराव्या अजिंठा – वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिला जाणारा प्रतिष्ठेचा पद्मपाणि पुरस्कार यंदा भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ संगीतकार, पद्मविभूषण इलयाराजा यांना जाहीर झाला आहे. महोत्सव संयोजन समितीतर्फे काल ही माहिती देण्यात आली. २८ जानेवारी ते एक फेब्रुवारीदरम्यान हा महोत्सव होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिकेत नव्या सभागृहात आता दहा स्वीकृत सदस्य नेमण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनानं दिली आहे. त्यामुळे एकूण सदस्यसंख्या १२५ वर जाणार आहे. निवडणुकीत ११५ नगरसेवक निवडून आले, मात्र २०२३ च्या शासन आदेशानुसार १० स्वीकृत नगरसेवक नेमण्यात येणार आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या विवेकानंद महाविद्यालयात आजपासून विवेकानंद व्याख्यालमाला सुरु होणार आहेत. तीन दिवसीय या व्याख्यानमालेत प्रसिद्ध स्तंभलेखक आनंद मेणसे, ज्येष्ठ इतिहासकार राम पुनियानी, राजकीय भाष्यकार प्राध्यापक अपूर्वानंद यांची विविध विषयांवर व्याख्यानं होणार आहेत. या व्याख्यानमालेचं हे आठवं वर्ष आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद नगर परिषदेच्या उपनगराध्यक्ष निवडणुकीत भाजप उमेदवाराला मतदान केल्यामुळे काँग्रेस पक्षानं आपल्या चार नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली आहे. पक्षाचे तालुका अध्यक्ष अनिल नलावडे यांनी हा प्रस्ताव जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर यांच्याकडे पाठवला. जिल्हाध्यक्षांनी तो पुढील निर्णयासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडे सादर केला. गेल्या शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसच्या अधिकृत भूमिकेला विरोध करत चार नगरसेवकांनी भाजपचे उमेदवार नवनाथ बारगळ यांना मतदान केलं, यात ते विजयी झाले.

****

इंदूर इथं झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताला न्यूझीलंडकडून ४१ धावांनी पराभव पत्करावा लागला. या विजयासोबतच न्युझीलंडने तीन सामन्यांची मालिका दोन – एक अशी जिंकली. काल झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडच्या संघाने प्रथम फलंदाजी करत ३३८ धावांचं लक्ष्य दिलं. प्रत्यूत्तरात आलेला भारतीय संघ विराट कोहलीच्या शतकी खेळीच्या बळावर ४६ षटकात २९६ धावाच करु शकला.

****

मणिपूरमध्ये इम्फाळ इथं झालेल्या राष्ट्रीय विशू स्पर्धेत जालना जिल्ह्यातला उदयोन्मुख खेळाडू वैभव पिराजी अंभोरे यानं तृतीय क्रमांक पटकावला. ६५ किलो वजनी गटात त्यांने ही कारवाई केली.

****

राज्यात काल सर्वात कमी नऊ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान गोंदिया इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात तापमानात वाढ झाली असून, काल धाराशिव आणि नांदेड इथं सरासरी १३, तर छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि बीड इथं सरासरी १४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****